MHWS080013322021

## रे.मु.नं. ९७/२०२२ मधील निशाणी क्र. ३० वरील आदेश

**१.** प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रीया संहीतेचे नियम ०६ आदेश १७ व कलम १५१ प्रमाणे लेखी जबाबात दुरुस्ती होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** प्रतिवादी यांचे अर्जातील कथनानुसार, दावा प्रलंबित असतांना काही घडमोडी घडलेल्या आहेत. त्यामुळे प्रतिवादीला दाव्याच्या योग्य त्या निकालाकरीता त्याचे लेखी जबाबातील परिच्छेद क्र.०९ नंतर खालीलप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र.१०—'वादींनी यापूर्वी विदयमान दिवाणी न्यायालय रिसोड येथे वादमिळकतीबाबत दि.मु.नं. १२३/२००६ भिमराव वि. सखाराम व इतर हा दावा दाखल केला होता, तो दावा दिनांक १६.०२.२०१६ रोजी निकाली निघाला. त्या निकालाविरुध्द वादीने वि. जिल्हा न्यायालय वाशिम येथे अपील दाखल केले व सदर अपीलामध्ये वादीने या प्रतिवादीला सुध्दा पक्ष केले असून सदर अपीलातील मिळकत व या दाव्यातील मिळकत हि एकच असून वि.जिल्हा न्यायालय वाशिम यांचे न्यायालयातील अपील दिनांक ०१.११.२०२५ रोजी खारीज करण्यात आले आहे व वि.दिवाणी न्यायालय रिसोड येथे दि.मु.नं.१२३/२००६ भिमराव वि. सखाराम व इतर या दाव्याचा निकाल कायम ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे वादीचा दावा यापुढेचालू शकत नाही, तो खारीज होण न्याय व इष्ट आहे'.

**३.** पुढे प्रतिवादीच्या कथनानुसार, सदरची दुरुस्ती लेखी जबाबात करणे आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती साधारण स्वरुपाची असून दाव्याच्या योग्य त्या न्यायनिर्णयासाठी जरुरीची आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर न झाल्यास प्रतिवादींची कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. याउलट दुरुस्तीमुळे लेखी जबाबाचे स्वरुप बदलत नसल्याने अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

४. सदर अर्जावर वादीतर्फे म्हणणे दाखल करुन अर्जास केवळ औपचारिक विरोध दर्शवला आहे.

५. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन करता वादीने प्रस्तुतचा दावा कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी नि.क्र. ०९ वर लेखी जबाब दाखल केला असून नि.क्र.१४ वर मुददे काढण्यात आलेले आहेत व दावा वादीच्या पुराव्यावर प्रलंबित आहे. दरम्यान वादीने नि.क्र.२३ वर दाव्यात दुरुस्ती करण्याचा अर्ज दाखल करुन रे.दि.अपील क्र. २९/२०१६ चे कामी प्रतिवादी पार्टी पक्ष करण्याच्या दृष्टिने अर्ज केल्याची दुरुस्ती दाव्यात समाविष्ट करण्याची मागणी केली. सदरचा अर्ज मंजूर झालेला असून त्या अनुषंगाने प्रतिवादी हे लेखी जबाबात परिणामी दुरुस्तीची मागणी करत असल्याचे दिसून येते. या कामी अदयाप वादींचा पुरावा सादर झालेला नसल्याने सदर दुरुस्तीमुळे वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच प्रतिवादींचे लेखी जबाबाचे स्वरुप देखील बदलणार नाही. याउलट अपीलाचे कामातील वस्तुस्थिती रेकॉर्डवर येणार असून त्यामुळे दावा गुणदोषांवर निर्गत करणे सोयीचे ठरणार आहे. सबब प्रतिवादींचा अर्ज मंजूर करणे नैसर्गिक न्यायतत्वानुसार न्यायोचित असल्याचे निष्कर्षाप्रत येउन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | प्रतिवादीचा अर्ज निशाणी क्र. ३० मंजुर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादींना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जात नमूद केलेली प्रस्तावित दुरुस्ती आदेशाच्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत मूळ लेखी जबाबात करावी व तशी लेखी जबाब दुरुस्ती प्रत याकामी दाखल करावी. |
| ३. | खर्चाबाबत कोणताही आदेश नाही. |

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL
Date: 2026.02.25 16:18:36 +0530

(पी.व्ही. सपकाळ)

दिनांक २५.०२.२०२६

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | H. A. Uchade. |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 25.02.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 25.02.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 25.02.2026 |